# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ
## Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University

सोलापूर -पुणे राष्ट्रीय महामार्ग, केगांव, सोलापूर -४१३ २५५ (महाराष्ट्र)
Solapur-Pune National Highway, Kegaon, Solapur-413 255 (Maharashtra)
✆: ०२१७-२७४४७७०,७१,७२,७३,७४ फॅक्स : २३५१३००
ईमेल : dbee@sus.ac.in संकेतस्थळ - http://su.digitaluniversity.ac www.sus.ac.in विस्तारीत क्रमांक : १३०




**◉ परीक्षा व मूल्यमापन मंडळ ◉ Board of Examinations and Evaluation ◉**

## परिपत्रक क्र. - ७१

**संदर्भ :** १) प्रस्तुत विद्यापीठाचे परिपत्रक क्र. २४/२०२३ जा. क्र. पअहोसोवि/पवमूमं/१११६, दिनांक २४/०५/२०२३.

२) प्रस्तुत विद्यापीठाचे परिपत्रक क्र. १०७/२०१९ जा. क्र. पुअहोसोविसो/परीक्षा/२०१९-२०/२३१४, दिनांक ०४/११/२०१९.

प्रस्तुत विद्यापीठ संलग्नित संबंधित महाविद्यालयांचे प्राचार्य / संचालक, विद्यापीठ परिसर संकुल संचालक यांना सदरील परिपत्रकान्वये कळविण्यात येते की, ऑक्टोबर / नोव्हेंबर २०२३ या परीक्षा सत्रातील विद्यापीठ प्रात्यक्षिक परिक्षा ( Practical ) घेण्याचे आयोजन महाविद्यालयात करुन प्रात्यक्षिक परीक्षेचे गुण संगणक प्रणालीमध्ये खालील निर्देशाचे पालन करुन खालील तक्त्यात नमूद अभ्यासक्रमाच्या विद्यापीठ (UA) परीक्षा महाविद्यालय स्तरावर घेवून त्यांचे गुण महाविद्यालयांना देण्यात आलेल्या लॉगीनमधून विद्यार्थ्यांच्या पीआरएन (PRN) च्या आधारे व उपलब्ध असल्यास बैठक क्रमांकाच्या आधारे ज्या त्या वर्गाच्या विद्यापीठ थेअरी परीक्षा सुरु होण्यापूर्वी अपलोड करावेत.

| अ. क्र. | विद्याशाखा निहाय विषयांचे नाव | Exam Category | Assessment Type |
|---|---|---|---|
| १ | बी. ए. (Music, NCC (Military Science), N.C.C. Studies Optional, Physical Education Optional, Yoga Studies, Education Optional इ.) | Practical | UA |
| २ | बी. व्होक. (जर्नालिजम ॲण्ड मास कम्युनिकेशन) | Practical | UA |
| २ | एम. ए. (प्रस्तुत विद्यापीठ संकुलातील संबंधित विषय) | Practical | UA |
| ३ | एम. एस. डब्ल्यू. (Field Work / Research Project) | Theory/Practical | UA |

वरील तक्त्यात नमूद केलेल्या अभ्यासक्रमांच्या विद्यापीठ परीक्षा या महाविद्यालय स्तरावर विद्यापीठ नियमानुसार अंतर्गत / बहि:स्थ पर्यवेक्षक व इतर बाबींची पूर्तता करुन सर्व परीक्षांचे नियोजन प्रस्तुत महाविद्यालयाच्या निगराणी खाली करण्यात यावे. सदर विद्यापीठ परीक्षेकरिता खालील निर्देशाचे पालन करण्यात यावे.

१) सर्व प्रथम अंतिम वर्षाच्या अंतिम सत्राच्या प्रात्यक्षिक परिक्षेचे नियोजन करण्यात यावे व त्यानंतर इतर सत्रांच्या प्रात्यक्षिक परीक्षा घेण्याचे नियोजन करण्यात यावे.

२) सदर परीक्षेकरिता अंतर्गत व बहि:स्थ परीक्षकांची नेमणूक संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्य मार्फत करण्यात यावी.

(P.T.O.)

३) प्रात्यक्षिक परीक्षेकरिता लागणारे साहित्य (स्टेशनरी व इतर साहित्य) संबंधित महाविद्यालयांनी प्रस्तुत विद्यापीठाच्या गोडावून विभागाकडून घेऊन जाण्याचे नियोजन करण्यात यावे.

४) अनु क्रमांक १ ते ३ च्या परीक्षेकरिता काम करणाऱ्या सर्व संबंधित कर्मचारी वर्गास विद्यापीठ परीक्षेचे सर्व नियम लागू राहतील.

५) तसेच ज्या महाविद्यालयाकडे संबंधीत विषयाचा नियमित शिक्षक नसेल तर त्यांनी इतर महाविद्यालयाच्या नियमित शिक्षकाची अंतर्गत परीक्षक म्हणून संबंधीत महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी नेमणूक करावी.

६) याबाबत काही अडचणी निर्माण झाल्यास विद्यापीठाच्या संबंधीत विभागाशी संपर्क साधावा.

(डॉ. म. स. रोकडे)
**प्र. संचालक**
**परीक्षा व मूल्यमापन मंडळ**

**जा. क्र. : पुअहोसोविसो/पवमूमं/मानवविज्ञान विद्याशाखा/२०२३/** 7592

**दिनांक :** - 6 NOV 2023

प्रति,

१) मा. प्राचार्य / संचालक , प्रस्तुत विद्यापीठ संलग्नित संबंधित महाविद्यालये / विद्यापीठ संकुल.
२) संगणक विभाग, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, प्रस्तुत विद्यापीठ.
३) वेळापत्रक विभाग, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, प्रस्तुत विद्यापीठ